तिहरा वहरी

दुहरॉ अंक

**२५ डिसेंबर २०१४**

# कादोडी

## नाताळश्या हनाव विशेषांक

खाजगी वितरन

**अंकाई किंमत**

**:- दा रुपय**

**संपादक :-** ख्रिस्तोफर रिबेलो (९८१९४३६०७८) **सहसंपादक :-** एडवर्ड डिसोझा

**<u>संपादक मंडळ</u> :-** सुनील डिमेलो, सायमन रॉड्रिग्ज, डॅनियल मस्करणीस, राजन डिमेलो, जेम्सन डिमेलो, रॉबर्ट फर्नांडिस, रॉबिन्सन डिमेलो, वॉल्टर तुस्कानो.

**Email :-** kadodivasai@gmail.com **Web: -** www.onevasai.com

**मुद्रक:-** मॅन्युएल प्रिंट, वसई पूर्व - ९७६५८७४४९३

## संपादकीय

२०१४ साल उजाडला. उजाडला मीनजॅ नुस्ता उजाडलास नाय तॅ बदलाअॅ वारा घॅऑन उजाडला. खूपशॅ बरॅ - वाईट बदल आपलॅला बगॅआ मिळालॅ. दिल्लीमीनॅ सरकार बदालल्ला. आतॅ-आतॅ आपलॅआ महाराष्ट्रात पन सरकार बदाल्ला.

बदल हॉना तहा बगीला तॅ बरास हाय. राजकारना आन समाजापुरता बॉलॅसा जाला तॅ, ता तॅ हरेक वख्ताला बदालता आहातॅ. आपल्यापुरता बॉलॅसा तॅ, आपलॉ कुपारी समाजं आन आपुन कोडे तरी बदललॅव. पयलॅन्षा काळी जकले जुने बोष्ठे घरे, जकले एक कुटूम रॅशे. भाटात खपॅशे. जा - का हाथा लागला ता मुक्काळॅ खाशे. लोक सुखी हॉता. मंग फादरलोक आला. तॅई शाळा बांदिल्यो. लॉकांना शिकशान दिला. लोक हिकॉन नोकऱ्यो करॅआ लागले. हाथा पैसॉ खॅळॅआ लागलॉ. मंग अस्तॅ-अस्तॅ जकला बदालला. खा-प्याशी, रॅशी रीत बदालली. शिकशान बदाल्ला. पायी ॲऑन - जाऑन हिकलॅल्या बयबाबाई पॉरांना शाळीत कालेजला जादो सायकल- मोटरसायकल हाडॉन दिले. तॅआई तॅना ओडी हव्वय जालॅ गा पोरे पायी फिरॅआ डुखात नाय. १९९० नंतर आपलॉ समाज एक सुशिक्षित समाज भगून नावारूपाला आलॉ. आज आप्ले पोरे बार दॅशात हिकात्यात. जहॉ जहॉ समाज बदाल्लो तही अस्तॅ-अस्तॅ जकलॅआना आपल्या समाजाआ-भाशेआबद्दल अहलेली तळमळ कमी हॉत गेली. लोक मराठी-इंग्लिशमीनॅ बॉलॅ लागला. ई कय वाईट नाय पन कादोडी बॉलना, जुन्या कौलाआ - कुडाआ घरात रॅना तॅनां कमीपनाआ मानला जा लागला. आपलॅ रितीरिवाज पन बदाललॅ. आतॅ कुटूम लाना जाला आन घरपन.

पयलॅन्शा काळात हाकोटे काळोखाय आलॅलॉ आन नावळ हाडयापोत वाजनारॉ आन आपल्या समाजाई शान अहलॅलॉ आपलॉ बॅन्ड आतॅ कुनातरी दापूडॅ-हॉलमीनॅ बॅहॅलॅलॉ दिखातॅ. बदालॅल्या समाजात DJआ गॉगाटात आपल्या बॅन्डला माखान लाऑन बॅहा लागाते. पयलॉ बॅन्ड लग्नातुस वाजॅसॉ तॉ आतॅ कॉमसारातपन वाजॅआ लागलॅ. पयलॅन्सॉ भॉळॉ-धार्मिक अहलॅलॉ कुपारी जाम आशावादी हॉतॉ तॉ आतॅ मा पॉरापारा लगीन मॅ कतॅ बगॅ ऑहॉ निराशावादी जालॅ.

आपलॉ समाज बेताम खुश हॉतॉ. जॅआ-तॅआ बरा सल्लोता. पन जकला वरवरसा हॉता. जॉ बारनॅ खुश दिखातॉतॉ तॉ घरा आतमीनॅ खोलीत-हॉलमीनॅ दुखी हॉतॉ. तॅला ॲकलापन वाटातोता. ५ -१० वहरा आदी मॅ - मॅ, माआस माआ ॲकटॅआस करनारॉ कुपारी आतॅ आपुन जकले, ई आपला जकल्यास आहा आतॅ बॉलॅ लागलॉ. कदो..? तॅ, बदालतॅआ जमान्यात जकलास बदालला. तॅला ॲकटा ॲकटा वाटॅआ लागला. आन मंग तॅला आपल्या भाशेई गोडी वाटॅ लागली. तॅला ती टिकवॉन ठव्यादों वाटॅ लागली. कदो? तॅ, भाशा टिकली तॅ समाज टिकॉन रॅदॅ आन समाज टिकॉन रॅलॉ तॅ तॉ सॉता टिकॅदॅ. भगून तॉ आतॅ आपल्या कादोडीत बॉलातॅ. हनारावळात कुपारी भगून मिरवातॅ. आपल्यो जुन्यो कान्यो आपल्या पॉराना, नातोंडांना आयकवीतॅ. आतॅ तॅआला पटलॅ, कुपारी इस तॅआइ खरी ओळख हाय आन ती तॅला टिकवॉन ठवॅशी हाय.

नाताळसॉ हन जकल्यांना खुब आनंदाव आन मजेऑ जाव अह्यो शुभेच्छा....

# स्कायलॅब - सिरील मिनेजिस, आगाशी

**("बबन" या कुपारी व्यक्तिचित्रन कादंबरी मिनशी एक कानी)**

बबन खाट्यॉरनॅ एकदा या कडॅला तॅ एकदा त्या कडॅला वळातॉतॉ. पन त्याई नीज कय लागात नोती. खाटयात भीखूनू नॉतॅ आन घरात मच्छरपन नॉता. पन तॅई आक्काबाई (नीज) कडशाकडे उडॉन गेलती. ऑडॅ दी सांतानसॉ विसार करॉन करॉन त्या डॉळॅला डॉळॉ लागात नॉतॉ. तॅत बीआ आज आयकीलॅल्या बातमीआ पायान तॅई नीज बाराभावाला गेल्ती. आतॅ तुमाला विसार लागलॅ हायद्यात की अही कुहनी बातमी कानोर आल्ती जॅय बबनशी नीज उडाल्ती.

गावात धुजूकाकाआ घाराआ पेपर यासॉ. तॉ पन दॉपारसॉ बारा वासता. बिशारॉ पेपर टाक्नारॉ काका पायी पायी फिरॅसॉ तॅतॅन त्याला उहुर हॉऑसॉ आन गावशे पोरे तॅला शीडवॅशे. 'काका उद्याचा पेपर आणला का'

भर निंबरात काकाई हिर खुब तापॅशी. पन तॉ कय बोलू शकॅसॉ नाय. बिशारॉ मुक्काअॅ पॉरांअॅ टॉमनॅ आयकॉन घॅसॉ. पन आज काका अकरा वासतास पेपर घॅऑन धुजूआ ओट्योर सडलॉ. तॅआ ओट्योर बरीस मंडळी जमलोती. काका पायरीओर सडताखोटी पॉरांई त्याई टिंगल करॅ सुरवात केली...

'काका आज पेपर घरीच छापुन आनला की काय..?'

आन जकले पोरे दात काडॉन खी-खी कऱ्या लागले. काकाऑ संताप जालतॉ, तॉ तिरीमिरीअॅ बोयलॉ, "हसा. शेवटचं हसा. फार थोडे दिवस उरलेत तुमचे. पेपर नीट वाचा." आहा बॉलॉन काका तडाक सलतॉ जालॉ. काकाआ आहा बॉलनॅनॅ, जकल्या पॉटात फाळ पडलॉ. जकले सामसुम जाले. जॉ तॉ पेपर बगॅदो धावलॉ. पन पेपर धुजू घॅतॉतॉ भगून पेपर वाशासॉ पयलॉ मान तॅलास हॉतॉ. धुजूनॅ पेपर उगडलॉ आन पॅपरात्शि काळया बॉठ्ठ्या अक्षरात लीविलेली बातमी जॉराय वाशिली... "वसईच्या पश्चिम किनारपट्टीला स्कायलॅब पडणार"

स्कायलॅब पाड्नार! आख्ख्या गावात बॉम्बाबोम्ब. जकल्या लॉकां तोंडोर काळजी-चिंता दिख्या लागली. खरा मीनजॅ स्कायलॅब का अहातॅ ई गावशा ॲका पन नगाला माईत नॉता. डोकरे-डाकरे ज्याई खुब पाहाळॅ बगीलतॅ ते पन विसारात पडले. आबोरनॅ पानी पडताना आन त्याबरबर "वांदे" पडताना बगीलतॅ, पन स्कायलॅब पडताना अजून कय नंदरॅत आला नॉता. सौदा जानेवारीला आबोरनॅ स्कायलॅब पडॅसा ई आयकॉन बवतेकांना नवालाआ बरबर घाभरॉपन वाटलॉ. आतॅ या स्कायलॅबला पडॅदो वसयसॉस किनारॉ बरॉ दिखलॉ..?

खरा हांगॅसा मीनजॅ ई स्कायलॅब, अमेरिकेनॅ ग्रह-ताऱ्या अब्यासाकरता आबाळात होडलेली प्रयोगशाळा होती. जॅत माहने नोते. या प्रयोगशाळेई मुदत खप्लोती. आपल्या कादोडीत हांगॅसा तॅ, ती डोबी जालती. तीई बॅटरी डाउन जालती मीनजॅस ती कय कामाई रेली नोती. आतॅ ती आबाळातनॅ पृथ्वीआ दिशेला घसऱ्या लाग्लोती. इस प्रयोगशाळा स्कायलॅब सौदा जानेवारीला वसयशा कुहन्यातरी १-२ गावोर संक्रांत हाड्नार होती. आतॅ ई स्कायलॅब नेमका कुहन्या गावोर पाड्नार याई काळजी जकल्या लान्या पॉरा-टॉरा पासून तॅ डॉकरॅ-डाकरॅना लाग्लोती.

ई बातमी आइकिल्यानंतर बबनशी गत घनी वाईट जाल्ती. निंगुतुस कडे तॉ पॅरमात पडलॉतॉ. तव मीनॅस स्कायलॅब पडॅसा ई आयकॉन तॉ धास्तावलॉतॉ. स्कायलॅब आपल्या गावात आन नॅमका माआस घरोर पडला तॅ..? आपुन जकले एकास वेळी मरनार, तॉहॉ तॉ मरनाला घाबरात नॉतॉ. पन अठवरॉ मरॅसा ई कय तॅआ मनाला पटात नॉता. ॲकदासा सांतानशा हरी वराड जालोसा, ७ - ८ पोरे जालोश्ये, कॉहॉ-बॉहॉ सुंवसार केलॉसॉ. ई तॅने बगीलॅला सपान अरदवट रॅदॅ गा का ? याई तॅला धास्ती होती. या स्कायलॅबनॅ कहा वाशासा याव तॉ विसार कऱ्या लाग्लोतो.

मॅ मामाराआस जाऑन रॅनॅ ऑहॉ तॅनॅ बेत पन कॅलॉ. पन समजा मॅ मामाराआ गॅलॉ आन ई माल्दिसाव स्कायलॅब तडे कॉहाळला तॅ...? “आडे बाव आन तडे बावखाल” अही अवस्था ब बबनशी जाली.

स्कायलॅब पडॅसा आन आपुन जकले मरॅशे ई बातमी गावात वाऱ्याहारकी पसारली. मंग का? आतॅ रॅलॅत तॉडॅ दी धमाल करॉन घॅऑ, ऑ विसार करॉन जकले मजा करॅशा कामाला लागले. रॉज निरुळ - मांदेळे आन पाखाट खानारॉ आगु हाकोट हांज हरगॉ नातॅ रावस खा लागलॉ. दुमानॅ तॅ आपल्या खुराडयातशी एकेक कोंबडी कमी करॅदो सुरवात केली. जॅन्ना जीवान जात नॉता बगील्या तॅई स्कायलॅब पडॅसा ई आयकॉन पॉटाला तडस भऱ्यापर्यन्त जिव्यादो सुरवात केली. रॉजशी पावशर पॅनारॉ पासू हांज हाकाळ इंग्लिश मारॉन इंग्लिश बॉल्या लागलॉ. आयतवारॅ पन दॅवळात न जानारॉ गोंडू हाकोटे हवारॅ ऊठॉन पासशा मिसाला जा लागलॉ. दॅरमॅरशा लॉकांना गाळयाव खुराब घालनारी कोसू आतॅ पकवाने करॉन वाटॅ लागली. जकला शित्र बदाललोता. जकला वातावरण टाईट जाल्ता. मॅरॅदॅरॅ बगॅदो लॉकांना वेळूस नॉतॉ. जकल्याई नंदार आबोर स्कायलॅब शोधीतोती. जही जही १४ जानेवारी तारीक जवळ येत गेली तहा लॉकां आवसान गळ्या लागला. बबनसा पन कय वॅगळा नॉता. भाटात केळीऑ आंगाठॉ जरी मॉडलॉ तरी तॅला वाटॅसा ‘स्कायलॅब पडलॅ हायदे आ..?’

ॲक्दासॉ १४ जानेवारीऑ दी उजाडलॉ. जॉहॉ उजाडलॉ तॉहॉस मावाळलॉ पन. आबोर डॉकॉन डॉकॉन जकल्याओ मानो दुख्या लागल्यो. पन स्कायलॅब पडताना कुनालास दिखला नाय. पन अजून रात बाकी होती. रातीआ पॉटात का हॉॲदॅ याव कय नेम नॉतॉ. कहेबाहे जीवने आटपॉन लोक खाट्योर पड्लोता पन नीज भगून कुना डॉळॅत येत नोती. बबनशी गत कय वेगळी नोती. तॅला सांतानशी आठोन येकहारकी येतोती. डॉळॅ बंद कॅलॅ गा आज तॅला सांतानशा जाग्योर स्कायलॅब दिखातोता. रात आस्तॅ आस्तॅ पुडॅ सरकातोती. रातकीडॅई किरकिर आंगोर येतोती. घराआ वाहयोरनॅ उंदराई पळापळ सल्लोती. घडॅळॅय काटॅ कय दिखात नॉतॅ. पन काटयाई टिकटिक जॉराय आयकॉ येतोती. ऑडॅत बॉड्डो आवाज जालॉ. बायारशा खांबोरसॉ दिऑ वीजलॉ. लाइट गेली. काळोक किट.

बबननॅ आस्तॅ आस्तॅ डॉळॅ उगडलॅ. शिनिमात सरगातसा शित्र दावडताना जहा धॉर दावडत्यात ताहा धॉर आख्ख्या घरामीनॅ जाल्ता. खॉकात खॉकात बबन उठॉन बॅहॅलॉ. त्याई बय बारझाड करताना त्याला दिखली पन बाबा कय दिखलॉ नाय. तॉहॉ तॉ मनातशा मनात बोयलॉ, ‘वाये! बाबा नरकात गॅलॅ हायदॅ आ..?’ समोर बयला बगॉन तॅला बरा वाटला. आपुन बयशाहरी सरगात पोसल्याव ऑहॉ तॅव समज जालॉ. तॅनॅ बयला हाक मारली..

‘बलो, स्कायलॅब आपल्यास घरोर पडला गा का..?’

‘कडसा स्कायलॅब..?’

‘ता रातसाआ पडला ताआ.’

‘रातसा कईस पडला नाय. हां पातॅराती शिशॅआ झाड पडला.’

‘मीनजॅ आपल्या घरोर शिश्याआ झाड पडला आ.’

‘आपल्या घरोर नाय ना लाईटीआ खांबोर, जक्ल्यो वायरी तुटल्यात.’

‘मंग आपुन सरगात कहे आले..?’

तही रोजुबायनॅ बबनशा पाठीत हालथ्याई झोड घायली. ‘कॉडलॅआ सरगात नाय ना तू, घारास हा.’

तॉहॉ बबन पागुनातनॅ बायार आलॉ. डॉळॅ उगडॉन तॅनॅ दॅरॅमॅरॅ नंदार टाकीली. खरस तॉ तॅआ घरातूस हॉतॉ. आरे हो, पन काल पडनारा स्कायलॅब कडे पडलॅ हायदॅ...? ऑ विसार तॉ करॅ लागलॉ.

‘दा वाजलॅत. आज हुट्टी अहली भगून का जाला? आख्खॉ दि आथुनात लॉळॅसा गा का..? उठ भाटात हिप्या जाय.’ रोजुबायनॅ हुखुम होडलॉ. पन हुखुम आयकॅदो बबन ऑथॉ कडॅ. तॉ जॉ निंगालॉ तॉ तडाक ऊबी रॅदो धुजूकाका ओट्योर. आदीस बरीस मंडळी धुजूकाका दापुडॅ जमलोती आन जकले पेपरवाल्या काकाई वाट बगीतोते. अकरा

वाजलॅ, बारा वाजलॅ. बरोब्बर साडे बारा टॉल्याला पेपरवालॉ काका आलॉ. ऑड्या उहुरानॅ अॅऑन पन त्याई टिंगल कुनॅ केली नाय. तॅनॅ टाकीलॅलॉ पेपर धुजूनॅ टुकॅशा आदीस बबननॅ टुकीलॉ आन पेपरातशी हेडलाईन जाकल्याना आयकॅदो जायदॅ ऑडॅ जॉरात वाशीली...

“काल सकाळी १० वाजुन १० मिनिटांनी स्कायलॅब अरबी समुद्रात कोसळले.”

मिनिट्बर जकला शांत जाला. आन मंग जमलॅल्या जकल्याई एकदम बॉम्ब केली “टिटीरी ढुम”

## नवरी हमदाव्यासा वारना!! - पॅट्रिशिया गोन्साल्वीस (मराडी - बोरीवली)

आपल्याअडे आतॅ लग्नाई धामधूम सुरू हाय. पांड्या गाऊनमिन्श्यो नवऱ्यो बगील्यो गा जहनी सोरगात्श्यो “पऱ्यो” उतारल्यात आहा वाटातॅ. नुस्त्यो राजाआ “रानी”गत सॉबात्यात. नवरीओ करवल्यो तॅ बगॅदोस नाका. “मांडव तॅ वरमायपोत” जकलेस जाम सॉबात्यात. ऑहॉ जकलॉ एकुन सौंदर्यसॉहळॉस आहातॅ. लग्नाला अॅनारॅ वराडीपन ब्युटीपार्लरला जाऑन आल्याशिवाय लग्नाला येत नात. आख्ख्या लग्नात केहे पीकलॅलॉ गव नातॅ बायकू शॉदॉन हापडॅशी नाय. असो. पॉरापाराई होस हाय.

नवरीला हमदाव्यादो एक ब्युटीशियन येतॅ. तीआ हाथात पयलॅन्शा काळात डॉक्टरदरी आहातोती तही पेटी आहातॅ. नवरीला खोलीत घॅऑन अॅका तासात तिला ‘परी’ करॉन मोकळी हॉतॅ. हान्शीपन शालू नॅहॅवॉन जकलॉ शृंगार करॉन नवरीला ‘अप्सरा’ बनवीतॅ. ई जकला बगॉन मन पयलॅन्शा काळात खिरातॅ. आमशा वयाशे मिनजॅ ४५-५० शा घरातशे, आमे आहास थोडाफार पन जाम हमदाऑन घॅटलॅ. पन त्याआदी ३० -४० वहराआदी मिनजॅ आमशा बारकॅपनी “नवरी हमदावॅशी” ऑ एक विधी हॉतॉ. एक वेगळीस रीत होती.

मांडवाआ दिहा मिनजॅ हिन्वारॅ हाकोटे दॅवळा जाऑन आली गा मंग मुंबयशी माईती अहलेली गावशी पोरी हरी घॅशी, तीआ बरबर नवरीआ माथा (आंबाडॉ) बांदयादो वान्द्र्या जासा. मॅ अही बरॅसदा आमशा गावशा नवरी पोरींबरबर गेले. (या सामानायो पिशव्यो धरॅदो) वान्द्र्याला (प) अल्को मार्केटशा मॅरॅ एक आंटी होती ती आपल्या नवऱ्यांए ‘आंबाडॅ’ बांदयाशी. “पफपफ”सॉ आंबाडॉ बांदीलॉ गा, आपली नवरी हिन्दी पिच्चरशी हिरॉईन दिखॅशी. तॉ आंबाडॉ नाहालॉ पा नाय भगून नवरी हिन्वारे रातशी उगडू नीजॅशी. सौदिऑ मिनजॅ हॉमवारपोत तॉ आंबाडॉ तॉहॉस रॅलॉ पाय या करता नवरी जाम जपॅशी. ई आहा कदो? ऑ विसार तुमशा डॉखॅत आलॅ हायदॅ. तॅ एकदाशी शिटी पडली गा, नवरीनॅ कानात, गळ्यात, हाथात कुहनॉस दागिनॉ घालॅसॉ नाय अही रीत होती. कदो तॅ लग्नाआ दिहा नवरी सोबली पाय ना भगून.

लग्नाआ दिहा हॅजाळ्यात “नवरी हमदावॅसा” वारना कॅला जासा. हाकोटे पांडरी साडी आन हान्शी टिकल्यो भरलेली साडी नातॅ शालू नॅव्हॅशे. गावशी नायदॅ तॅ मंग नात्यातशी कुन साडी नेव्हीन्यात आन मेकअप करन्यात हुशार हायदॅ तिला नवरीला हमदाव्यादो खास बॉलवॅसा. खोलीत नातॅ ओहरीत हाथरी (चटई) टाकॅशी. हेजोळात्श्यो जक्ल्यो बायको - पोऱ्यो जमॅश्यो. नवरीला साडी नेव्हीत्या वेळी बायको गानॉ बॉल्याश्यो- “दोये नाय ना पुरलॅ ला आयशॅ लाड, दोये सासरॅआ जातॅआ वेळी..” अहे गानॅ आयकॉन नवरी पोरी हमखास रडॅशी. (हमदावीताना नवरी रडली गा गानॉ बॉलनाऱ्यो बायको मनातशा मनात जाम खुश हॉअॅश्यो. पन समजा अॅखादी नवरी पोरी नाय रडली तॅ जमलॅल्या बायकांत कुजबूज हॉअॅशी - ‘डॉळॅतनॅ एक टिप पन आला नाय ता). आमे बारके पोरे ई जक्ला डॉळॅत

आन मनात साठवॉन ठव्याशे. अफगान स्नो, मीना खाकी पावडर आन काजाळ, लिपस्टिक ऑडॉस "मेकअप किट" अहॅसॉ. क्वचित बेलिजा क्रीम नातॅ पॉन्ड्स पावडर अहॅसॉ. मेकअप करताना जमलॅल्या बायकां - पोऱ्यानदरनॅ ओब्ड्यो ब्युटी टिप्स मीळॅश्यो. ई आहा जक्ला होशीत हमदावॅदो बोलविलेली नवरीला हमदावॅशी. मेकअप जालॉ गा, दागिनॅ घालॅशॅ. आन मंग शेवटाला आंबाड्यावर आंबोलॅई माळ भरॅशी. माळ भरली गा नवरी हमदावली.

काळ बदललॉ. काळापरमानॅ आपलॉ समाजपन सुदारलॅ. पैसॉ आलॉ, सुख-सोयी वाडल्यो. आतॅ नवरी हमदावॅदो 'ब्युटिपार्लर वाळीला' घारा बोलविला जातॅ. त्याकरता ती दरनॅ मयनॉ - दोन मयनॉ आदी टाइम घॅटला जातॅ. फेशियल, ब्लीच, मेंदी, वॅक्स पासून तॅ नवरीआ माथा-कपडे जक्ला ती दरनॅस करॉन घॅटला जातॅ. कुनाला हांगना नाय गा वारना नाय. "नवरी हमदावॅसा वारना" रीत बंद जाली. बायको जमॅश्यो रेल्यो भगून जूनॅ गानॅ गॅलॅ. नवरी हमदाव्याशी एक वेगळीस मजा होती. आमा बारक्या पॉरा ज्ञॅनात भर पडॅशी. आतॅ ई जक्ला बदलत्या काळाबरबर भूतकाळात गॅला. पन तरीसुद्धा मना कॉपरॅतनॅ कडनॅ तरी आवाज येतॉ रॅतॅ "नवरी हमदावॅसा वारना".

# आठोन - बबिता आर. डिसोझा

मे मयन्याई रजा आली गा त्या गोष्टीइ आठोन येतॅ. आमे दोन गावश्यो पोऱ्यो एकत्र खॅळॅश्यो. रॉजसॉ खेळ वॅगळॉ. दॉपार जाली गा जमल्यो जक्ल्यो १०-१२ जनी. मंग आमे जुन्या पोल्ट्री मॅरनॅ खॅळॅशे. आमबॅ खाशे. पाने (पत्ते) खॅळॅशे, कतॅ कतॅ पान्यात पॉअॅदो उतरॅशे. तॅ कतॅ हांचापारा मावरा पकड्यादो. आहास एक दी आमसा ठरला की आपुन एकत्र मापधान करॅसा. एकीनॅ साउळ, एकीनॅ हुक्क्या बुम्लायो काडयो, कुनॅ कांदॅ, कुनॅ बताते, वांगे, मशालो, तॅल आहा जक्ला कय ठरला. धान करॅदो भांडे हाडॅशी जबाबदारी आमोर आली. आमोर मीनजॅ मॅ आन माई ताई.

ताईनॅ आमशा बयला मापधान काहा करॅसा ता विसारला आन बयदरनॅ लागनारे आमषे भांडे - एक भोटी पशंडी, त्योरशी बशी, हुरी, पिंडा, समसॉ, आन एक लानी पशंडी आहा जक्ला घॅटला. ठरल्यापरमानॅ आमे मापधान खोल्योर घॅऑन जीवनार होते.

दुहरॉ दी उजाडलॉ, दॉपारसा जीवान जाला पन जीवनोर ध्यान कुंना हाय. आज जकले लवकरूस आमशा घरापुडॅ जमले आन जकला समान-सुमान घॅऑन नेहमीशा खॅळॅशा ठिकानी पोसले. कय सुल मांड्या लागल्यो, कय कांद्या-बताता कापकुटीला लागल्यो, कय दॅरॅमॅरॅ पडलॅलॉ पालॉ पासाळॉ, काडयो जमा करॉन सुल पेटव्या लागल्यो. सुल पेटली. सुलीओर पशान्डा सडला. तॅल पडला. साउळ, बुंबूल धवॉन जालॅ. बयनॅ हांगीलॅपरमानॅ ताईनॅ साउळ आन पान्या माप करॉन मीठ मसालॉ लावीलॉ. एकीनॅ सुल आब्तीली. तव दोगीई केळीअॅ आंगाठॅ कापॉन हाडलॅ. दोगीई सापसपाई केली. सुल्योरसा आंदानाला उकळी आली तहॉ वास यादो सुरवात जाली. तहयो दोन कोत्यो मॅरॅ केल्यो. कोत्यो मॅरॅ करता खोटी धॉर जाला. जॅई पोल्ट्री ओथी तॉ नॅमकॉस मोटर लाव्या भाटात आलतॉ. रिकाम्या पोल्ट्रीतनॅ धॉर येतॅ ता बगॉन तॅनॅ धाव मारली ती ऊबी रॅदो आमशा सुली पुडॅस. जी आमे पोल्ट्रीमीनॅस मांडीलती. तॅव जालॉ संताप. आमाला गाळयो मारीत तॅनॅ सुलीऑरशी पशंडी समशाहॅगाट मॅरशा बाइत (बाव) टाकीली. तॅत बी आमे शाईबाबा शाईबाबा आहा आडडातोते. तॅला जो राग आलतॉ तॉ तॅनॅ सुलीओर पानी मारल्योर थंडॉ जालॉ. आमे अडे-तडे निकले. तॉडा आलॅलॉ घास काडतॅत तॉ ऑहॉस. आमशे खॉलॅए पाने तहेस रेले. आमसॉ खेळ कय जालॉ नाय. शाईबाबानॅ हिप्ना कॅला आन मोटर बन्द करॉन तॉ घारा गॅलॉ. तॉपर्यन्त जकला सामसुम. तॉ गॅलॉ तहे आमे बाइत उतारले आमशा बयशे भांडे शॉदॅदो. जकले भांडे मिळाले पन बयसॉ आवडतॉ समसॉ कय आमाला हापाडलॉ नाय. रातसा बयला जकला हांगीला. ती रागावली नाय. तिला हांगीला, "बो! तूआ आथासास मापधान बरा लागातॅ.

बय- स्व. इजमाल पिटर तुस्कानो.

## कादोडी अंक आन मॅ कुपारी - एक कुपारी

आपली मायबोली (कादोडी) वासव्याकरता आपुन एक 'चळवळ' सुरु केली. त्याव एक भाग आन सुरवात 'कादोडी' या आपल्या भाषेतश्या अयल्या पयल्या त्रैमसिकान जाली. आपुन जकाल्याई त्या मनापासून स्वागत कॅला, कवतिक पान कॅला. पान कय चांगलॅ प्रकल्प एखाद्या कारनान मांगॅ पडात्यात आन ता कारन मंजॅ पैसो...निधि. निधी नहलॉ तॅ आपुन कईस करू शकात नात. आजश्या वाडत्या मागयश्या जमान्यात अह्या प्रकारसॉ अंक सालविना मंजॅ तारीआ तळोर सलन्याहांगडा हाय. माला आहा वाटातॅ कि, प्रत्येक कुपाऱ्यानॅ या 'कादोडी' अंकाकरता एक रुपय जरी दिलो तरी या त्रैमासिका, मासिक....मासिका, साप्ताहिक आन साप्ताहिका दैनिक ओह्यादो ओखत लाग्यासो नाय. जकल्या कुपा-यांना आहास वाटातॅ हायदॅ तॅ कामाला लागा. मानशी फक्त एक रुपय जमवा आन 'कादोडी' अंकाकरता धाडा. या चळवळीला हाथभार लावा आन तुमशी आमशी इ भाशा वासवा.

## बाबूकाका, भय आन विरार लोकल - सचिन मेंडीस, बोळींज

शिमुकाका डॉळ्या अप्रिशान कॅलता तॅ तॉ घारास हॅतॉ. जालता का, शिमुकाकाई भय आढ्याशी होती मंबयवरनॅ आन कऱ्यासा का आहा शिमुकाका जालता. मंग का, एकूस माहनु हॅतॉ मदतीला. 'वन & ओन्ली बाबूकाका लुद्रिक'. शिमुकाकानॅ बाबूकाका फेसबुक वोल वर पोस्ट कॅला, "Bhay want, come fast'. बाबूकाकानॅ अंद्र्याला मिस कॉल दिलॉ आन दोगी गॅलॅ शिमुदरी. शिमुनॅ बाबूपा गोरेगावश्या तबॅल्याव पत्तॉ, भय शे २००० आन टेम्पू कऱ्या २०० रुपय दिलॅ.

दुहाऱ्या दिहाआ हाकोटे बाबूकाका आन असिस्टन अंद्र्या गोरेगावला पॉसलॅ. तबॅल्यावाल्यानॅ हांगीला तुमे टेम्पू घॅऑन या तावपोत मॅ भय भादरॉन ठोयतॅ. जाला, बाबू-अंद्र्या निंगालॅ टेम्पूआ जुगाड कऱ्या. रस्त्यात त्यांना एक दुकान दिखला, 'सरकारमान्य देशी दारूचे दुकान', आतॅ कय हांग्या पाय गा. अंद्र्या तॉडाला हुटलॉ पानी, बॅहलॅ दोगे आन टेम्पूआ भाडा जाग्या लावीला. आतॅ का कऱ्यासा, किशात नाय दमडी आन आथात भय तांबडी... न्याशी कही. बाबूनॅ डॉख्यात प्लान कॅलॉ (बाबुकाका का दिमाग फोर-जी से भी तेज चलता है) आन अंद्र्याला बोयलॉ, 'अंद्र्या घॅ भय रेल्वे टेशनला, सल लोकल ला' अंद्र्या घाभरलॉ, आदीस देशी पिलती त्यात इंग्लिश मिनॅ हांगातॅ, 'भय is not allowed, it's an offence as per law' बाबूनॅ उत्तर दिला, '२०० दे आनी कायदे कर'. जाला, दोगे भय घॅऑन platform नंबर १ वर विरार स्लो उबी होती तिआ बिरग्यात खिरलॅ. दॅवा कृपॅनॅ विरारपोत कून आल नाय. गाडी विरारला पोसली, गेटवर बगीतॅ तॅ ४-५ टीशी. टीशी बगीता खोटी अंद्र्याअॅ हाथ-पाय गळया लागलॅ. पान हार मानदॅ तॉ बाबूकाका कॉहॉ. बाबूकाकानॅ अंद्र्या आथात भयशी पाग दिली आन हांगीला, 'ई वर लक्ष दे, मॅ आलॉ'. बाबूकाका तडाक गॅलॉ तॉ टेशनमास्तरश्या केबिनमीनॅ, टेशनमास्तर मिश्रा समोशी खातोतॉ. बाबूकाका त्याला बोयलो, 'Sir myself Babukaka, born and brought up in Virar, I need your help', मिश्राजी बोयलॉ, 'का हेल्प चाही?' बाबूकाका हांगातॅ, 'मिश्राजी हम हमार भय को I mean भैसवा को बंबई लेके जाना चाहत हू, लोकल मा, अभी उसको luggage मा चढाया हू, तो तौनो कोई प्राब्लेम तो नही है ना?'. जाला मिश्राजी आ तॉडाशी समोशी बायार आली 'नही नही...भैसवा को नही ले जा सकत है, उतार दो उसको'. मिश्राजीनॅ दोन हमाल हरी गॅथलॅ आन बाबूकाका हरबर जी धाव टेकिली ती उबी ऱ्या बिरग्या दरबाजापा. हमालाई डब्यातनॅ भय वेवस्तीत उतरविली आन गेटश्या बायार काडॉन दिली. काम फत्ते जालता ता बी फुकाट...!

जाताना बाबूकाकानॅ टीशीला हाक दिली, 'का हो दुबेजी, कैसन बा, सबकूच ठीकठाक तो है-, कोई बकरा नही मिला क्या आज'.

# ती फुलरानी - सॅबी परेरा, नानभाट

पु. ल. देशपांडे या मराठीतशा बॉठ्या लेखका “ती फुलराणी” नाटकात भक्ति बर्वेनॅ आपल्या कलाकारीनॅ गाजविलॅलॉ “तुला शिकवीन चांगलाच धडा” ऑ गानॉ ॲखादी कुपारी बायकू आपल्या पाळलेल्या कोमडीला कहो बॉलॉन दावदडे ऑ विसार करॉन त्या गान्या कॅलॅला विडंबन गीत. (ज्याई ऑ ती फुलरानीतसॉ गानॉ बगीलॉ नाय त्याई तॉ YOU TUBE वर बगावॉ)

आहा गाई, तुला हिकवीनॅ बरबर धडॉ
तूआ पापाव भरलॅ घडॉ, तुला हिकवीनॅ बरबर धडॉ
समजाता सॉताला ओडी शानी, मंग मुकाटॅए हाळांब्यात बॅह गनी
सुळीत घाल तुई सॉबा, शार ताते घालदा तॅ हांगॅनॅ बाय माई शानी
तुआ काक, तुआ कॉककॉक, तुअॅ झॅपाटॅ, तुई करकर
तुअॅ नखरॅ बॅह्रा पडो, तुला हिकवीनॅ बरबर धडॉ
सावुळ खाता माअॅ आन ताते लॉकांना, अही तु कुलटा
तु बॅह बास जराशी दुखा, मंग टांगवीतॅ तुला उलटा
मंग कोडी पन कर गयावया, माला याशीस नाय दया
मुंडकी धरॉन पान्यात
तिगाळास मरदॅ तुआ आंगसॉ कीडॉ, तुला हिकवीनॅ बरबर धडॉ
ॲका झॅपाट्यात पाडता फळीओरश्यो बारन्यो, तॅ बियात तळासा कथान
पावला पावलोर घालता राही, करॅशी कोडी तुई जतान
हन आलॅ नाताळसॉ आन मोरली हाडले पाजवॉन
हिजवीनॅ घना आन रस करनॅ थॉडॉ, तुला हिकवीनॅ बरबर धडॉ
लॉकां हाळांब्यात आन झाडोर कॉडॅ दि बॅहॅदा मा बाय
घरशा सावळाई येद तुला येतॅ गा नाय
तु आज ये बास घारा
पायरीओर घवीनॅ टॉक तुई, आन पाखाला बांदीनॅ शिंदी
वनदेवी हिंगाव पाजीनॅ पानी थॉडॉ, तुला हिकवीनॅ बरबर धडॉ
खळॅशा उडव्यातनॅ आली ती बार, मांगॅ-पुडॅ पिले शार-शार
डॉकायतॅ अडे-तडे, खाला-वर, नाय गनी कडे कागूळॉ गा घार
आयकात्यागा, ई बगाना नवाल, कोमडी बरबर इस्टाल-फजाल
इदो आतॅ नवॉस हाळांबॉ हाडॉ
लांब रॅ थॉडॉ नाय तॅ आपल्यालास हिकवीदॅ ती बरबर धडॉ

# आज आयत्वार हाय - राजन डिमेलो, आगाशी

आज मॅ सुशॅगात लॉळात पडनार हाय,
माला ई जमॅदॅ कारन, आज आयत्वार ना, माला आज रजा हाय ना

तुला नेहमी प्रमानॅ आजसुध्दा पास वाजतास उठला पाय, पयल्या मिस्साला जासा हाय,
मिस्सोरनॅ आल्योर पॉरांना उठव्यासा हाय, त्यांकरता नाष्टा करॉन त्याना देवळा धाडयासा हाय,
तुला ई जमॅदॅ कारन, आज आयत्वार ना, तुला आज रजा हाय ना,

माला आज सावकाश आठ-सडेआठ वास्ता उठयासा हाय, आठवाडॉभर गाडी-गॉढ़यातनॅ परवास करॉन मॅ थकलॅ ना,
माला ई जमॅदॅ कारन, आज आयत्वार ना, माला आज रजा हाय ना,

तुला आतॅ जकल्या करता 'ब्रेक-फास्ट' बनव्यासॉ हाय, बार-झाड, ठाव-भांडा, वगैरे कामे हात,
तुला ई जमॅदॅ कारन, आज आयत्वार ना, तुला आज रजा हाय ना,

आठ-साडे-आठला उठल्योर माला तॉडात ब्रश घालॉन टीवीआ समोर बातम्यों बगित भ्यासा हाय,
माला ई जमॅदॅ कारन, आज आयत्वार ना, माला आज रजा हाय ना

तुला आज आठवाडयाभराए कपडे धॉव्याशे हात, धोविल्याले कपडे व्यवस्थित घडी घालॉन लावॉन ठॉव्याशे हात,
तुला ई जमॅदॅ कारन, आज आयत्वार ना, तुला आज रजा हाय ना,

मा ब्रशिंग जला, मॅ तॉड दुव्हिला, माला जाम भुक लागलॅ, नाश्त्या हरी गरमा-गरम शा पान प्यासॉ जालॅ,
ई जकला मॅ आज आरामात करणार
माला ई जमॅदॅ कारन, आज आयत्वार ना, माला आज रजा हाय ना

तुला कपडे दुव्हील्योर लगेच तयारी करॉन शाळीत जा लागॅ, 'ओपन डे' हाय ना आज,
(माला अभ्यासातसा कईस मींजॅ कईस कळॅ नाय, नाय तरी ती जबाबदारी तुईस हाय),
तुला ई जमॅदॅ कारन, आज आयत्वार ना, तुला आज रजा हाय ना,

आतॅ माई जरा धावपळ हाय कारन माला आतॅ नाक्योर जासा हाय,
मित्रांना बॅठयासा हाय, हांचापारसॉ बैठकीऑ बेत क-यासॉ हाय, बॅंकेत जासा हाय,
माला ई जमॅदॅ कारन, आज आयत्वार ना, माला आज रजा हाय ना

तुईपन धावपळ हाय, शाळीतनॅ यॅऑन सरळ स्वयंपाकाला लाग्यासा हाय,
स्वयंपाक व्यवस्थितुस जालॉ पाय नायतर सगळ्याई नाराजी पत्का-या लागॅदॅ,
स्वयंपाक कमी-जस्ती जालॉ, खुटलॉ कॅलॉ तॅ तु करता पुन्हा तुलास क-यासॉ हाय,
तुला ई जमॅदॅ कारन, आज आयत्वार ना, तुला आज रजा हाय ना,

माला आज जीविल्योर इंडिया-पाकिस्तान क्रिकेट मॅच बग्याशी हाय,
मॅच बगिता-बगिता ४-५ वाजेपर्यंत निज्यासा हाय,
माला ई जमॅदॅ कारन, आज आयत्वार ना, माला आज रजा हाय ना

तुला पन आज किचनशी आठवड्याभराई साफ-सफाई क-याशी हायदॅ,
फ्रिज साफ क-याएसए हायदॅ, मग सगळ्यांकरता शा क-यासॉ हाय,
तुला ई जमॅदॅ कारन, आज आयत्वार ना, तुला आज रजा हाय ना,

आतॅ मॅ उठल्यानंतर शा' पॅऑन 'वॉक'ला जासॉ कारन पायाशे हांदे दुखात्यात, युरीक ॲमसीड वाडलॅ
त्या करता व्याम क-या हांगीलॅ डॉक्टरनॅ.
माला ई जमॅदॅ कारन, आज आयत्वार ना, माला आज रजा हाय ना.

(मोदी सरकारनॅ कामाए तास वाडविल्यात, त्या करता ऑफीस मिनॅ जास्ती धावपळ हॉतॅ. परत गाडी पकडया धावपळ क-या लागतॅ ती वेगळी...त्या मुळॅ यूरीक ॲनसीड वाडलॅ. आर्थात, यूरीक ॲवसीड वाडन्याआ ई कारन जर तिगाळा अर्नाळश्या नरु डॉक्टरला हांगीलॉसा तर तॉ बोयलोसॉ, "भोसडीच्च्या, माला गोष्टी शिकवतोस का? यूरीक ॲतसीडच्या, दारू पीऊन तूझं यूरीक ॲकसीड वाडलाय).

तुला आतॅ पॉरांए प्रोजेक्ट बनव्या भ्यासा हायदॅ, उदया शाळीत सबमीट क-याशे हात ना,
प्रोजेक्टला मार्क अहात्यात गनाय......पोरांना टक्के मिळाले पात गनाय.....
तुला ई जमॅदॅ कारन, आज आयत्वार ना, तुला आज रजा हाय ना,

आतॅ वॉक करॉन आल्योर माला मित्रा हरी भ्यासा हाय, आज जरा एक बैठक ठरविलॅ
माला ई जमॅदॅ कारन, आज आयत्वार ना, माला आज रजा हाय ना

तुए प्रोजेक्ट, गृहपाठ, वगैरे जाल्या हायदयात तॅ आतॅ तुला हांचपारश्या स्वयपाकाला लागला पाय, उदया सगळे कामोर/शाळीत जाशे त्यां सगळ्या कपडयाई, डब्याई तुला तयारी क-याशी हाय....तुई तयारी पन तुलास क-याशी हाय, मग जीवान जाल्योर ठाव-भांडा करॉन तुला साडे अकरा – बारा वाजॅ पर्यंत निज्या मिळदॅ मींजॅ हाकोटे जरा लवकर-लवकर तयारी करॉन कामोर जाता येदॅ....
तुला ई जमॅदॅ कारन, आज आयत्वार ना, तुला आज रजा हाय ना,

मॅ बैठकी वरनॅ आलॉ गा माला रातश्यों १० वाजता न्यूज़ बगिता बगिता जिव्यासा हाय.... आणि मग लगेच निजला पन पाय कारन माला उदयाला कामाला जासा हाय...
माला ई जमॅदॅ कारन..........................

कॉडाई कॅला तरी मॅ पुरुष, तु बाई,
तुला नोकरी करता करता ई कसरत केली स पाय

(तर मंडळी, माऑ प्रश्न ओहॉ हाय कि समाजाई ई 'मेंटॅलीटी' बदलॅदॅ गा.....?)

---

## बायबलमिनसा अंकगणित. - सुनील सायमन डिमेलो, वाडी (गाहा).

गणित शब्द बोयलॉ मीनजॅ लानपणी आंगाला कापरी हुट्याशी....पन अंकगणित ऑ परकार जगा सुरूवातीपासून अस्तितवात हाय. जकल्या कुमारी कुपारी विसार करद्या की मस्त ख्रिसमससॉ हन हाय आन या गाहाकराला गणिताआ का पडलॅ ??? बरबर हाय तरीपन या निमीतानॅ दॅवाऑ शब्द बायबल वाशीलॉ जायदॅ भगुन ऑ तरास.

६ दिहात दॅवानॅ ई अल्लामत दुनिया बनविली आन ७ व्या दिहा आदाम आन ७ १/२ व्या दिहा एवा बनविली. (आन ती त्या डोख्योर बेहविली ??) जुन्या करारात उत्पत्ती पुस्तकात फारो राज्याला स्वप्न पडातॅ तॅत पयल्यो ७ जरशी गाय दिखात्यात मंग ७ रोकट्यो गाय दिखात्यात.... निर्गम पुस्तकात परमेश्वर फारो राज्योर १० पिडा धाडतॅ...आन ख्रिस्ती धरमा सार मीनजॅ १० आज्ञा....ताहास आपल्या ऊत्पन्नाऑ दाव्वॉ हिस्सॉ.. दशांश दान करॅसॉ नियम खूप जुनॉ हाय...(८ दिहाला १ दा आयातवारॅ मिस्साला जाऑनसुध्दा कशीन कोडी टाकीत्याव !!!)

नॉहा काळात ४० दि आन ४० राती पानी पडलॉ योना माश्या पॉटात ३ दि होथॉ .

प्रत्यक्ष देवपुत्र पवित्र मरीयामावली पॉटा जन्मा याश्या ६ मयनॅ आदी दॅवानॅ योहान धाडलॉ..
बाळ येशूला भॅट्यादो ३ राजॅ आलॅ. येशू १२ वहराऑ असताना येरूशलेमला घालवालॉ..
४० दि सैतानानॅ येशूई परीक्षा घेटली. १२ वहरे रक्तस्रावानॅ आजारी अहलेली बाई येशू वस्रा गॉड्याला हिवली आन बरी जाली.

बायबलमिनसा शेवटसा पुस्तक प्रकटीकरन जॅ वाशीला तॅ नुसतॅ अंक भरल्यात...१४४ जनावर शिक्कॉ...७ समयो ७ वाट्यो...१० हिंगे...४ प्रानी.......
येशू ख्रिस्त ३३ व्या वहरा ३ वाजता
आपल्या तारनाकरता सॉताआ रगात दिला...
१३ आकडॉ पनवती आहा हांगात्यात माऑ सॉताऑ त्योर विश्वास नाय... कारऩ येशू ख्रिस्त १२ शिष्याना घॅऑन दॅवाई सुवार्ता हांग्यादो फिरातोतॉ तिगाळा तॅ १३ जन हॉतॅ...१३ मे १९८० या दिहा संत पॉप जॉन २रो योर हल्लॉ जालॉ पन ज्या मरीया मावलीवर तॅव भरॉसॉ हॉथॉ तिनॅ वाशविला..१९१७ सालात मावलीनॅ १३ मे तॅ १३ ऑक्टोबर या दिहात फातिमा गावात दर्शन दॅऑन १३ आकडॉ "शुभ" कॅलॉ ........
मा आयुष्यात मात्र १३ आकडॉ खॅळलॉ. मॅ १३ मयन्याऑ असताना ३९ (१३*३) वहराऑ आमसॉ बाबा आमाला अनाथ करॉन दॅवाघारा गॅलॉ आन ६ वहरानंतर १३ वहरायी आमशी एकुलती लाडकी बेन दॅवानॅ बॉलवॉन निली...

# "सावळॉ गोंधळ" - सिमसन बिशामास्तर पहरावकर

मागशा वेळेला कंपनीआ कॅटरिंगसा इंस्पेक्शन हॉनार हॉता. हेड ऑफिसवरनॅ एक अरब ॲनार हॉतॉ. हाकोटे ९ सा टाईम दिलता आन १० जालतॅ तरी वारूऑ पत्तॉ नॉतॉ. शेवटी १०:३० ला गेटसमोर एक गाडी थांबली आन तॅतनॅ तॉ पांडरॉ "हरब" बायार ऊतारलॉ.

वरपासून खालपर्यंत पांडरॉ लोब व डोख्योर शेषनागा गथिन जाड काळी दोरी , या त्यांशा नेहमिशा देशी अवतारात तॅनॅ आगमन कॅला. अससलाम आल्लैकूम,ठोक दे सालेकूम वगैरे वगैरे नमस्कार- चमत्काराऑ सोपस्कार पुर्न जाल्योर तॅनॅ माला व माआ जोडीला अहालेल्या केरळशा सुपरवायझरला विसारला, " हिंदी?" मीनजॅ इंडियन गा? मॅ "हा "हांगिला. मंग तॅनॅ पुङॅ तास विसारला जा अरबी लोक जवळजवळ प्रत्येक इंडियन्सला विसारत्यात , "केरला गा बॉम्बेई?" त्योर मॅ हांगिला की, "मॅ बॉम्बेसॉ आन ऑ केरलासॉ." केरलासॉ आयकताबरबर तॅआ तॉड 'करेला' गथिन कडवाट जाला. कदो ता अजूनपर्यंत माईत नाय.

मग तॅनॅ आमशा हरी हेड ऑफिसश्यो गप्पागोष्टी मा-या सुरवात केली. तॉड्यात त्या केरळशा सुपरवायझरला साईटवरनॅ तॅआ गाव वाल्याव फ़ोन येतॅ. तॉ सुपरवायझर फोनवर त्यांशा भाशेत रागारागाय बोल्या लागातॅ. त्यांशा संभाषणात दोनशार कवळे नाळ फोडलॅ जात्यात. पाच धा लिटर ताडी जमिनीओर होळली जातॅ. ता आयकॉन तॉ अरबी माला बाजूला करॉन हळूस विसारतॅ की, "का जाला रॅ? तॉ का बॉलातॅ? तॉ ऑडॉ शिडलॅ क़दों?" तॅ मॅ तॅला हांगिला की माला का माईत तॉ का बॉलातॅ तॉ. तॉ केरळसॉ आन मॅ बॉम्बेसॉ. मा ऊत्तर आयकॉन तॅआ तोंडोर भरतनाट्यम करताना जहॅ भाव आहातॅत तहॅस भाव प्रश्नचिन्हा रूप घॅऑन नाशा लागलॅ. तॅ त्योर मॅ तॅला समजाऑन हांगिला, "अरे, ई बग. मॅ बॉम्बेसॉ आन माई भाषा हिंदी तर तॉ केरळसॉ आन तॅई भाशा मल्ल्याळम. तॅई मल्ल्याळम माला कळॅ नाय पान माई हिंदी त्याला कळातॅ भगून आमे मंग हिंदी नातॅ ईंग्लिशमिनॅस बॉलात्याव." त्योर तॅनॅ ओके ओके करीत कयतरी गुप्तज्ञान मिळाल्यागथिन तॉड कॅला.

ऑड्यात तडे एक मद्राशी अन्ना येतॅ आन तॅआ केरळशा सुपरवायझर हरी कुहन्यातरी गोष्टीओरनॅ डायरेक्ट हुज्जत घाल्या लागातॅ. ऊत्तप्पा, इडली-सांबार वगैरे शब्दोरनॅ कदाचित तॅला हाकोटे नाश्तॉ कमी मिळाल्याबद्दल

आकळ जाले हायदॅ ऑहॉ मॅ तर्क लाविलॉ. त्यांसा भांडन आयकॉन तॉ अरबी माला हळूस विसारतॅ की, "ऑ कून?" तॅ तॅला मॅ हांगीला, "ऑ, मद्राससॉ काळॉ ससॉ.. आय मीन कॅम्प बॉस. मद्राससॉ." तॅ माकून तॅआ अरब्यानॅ माला विसारला, " का जालॅ का? तॉ का बॉलातॅ? "तॅ मॅ तॅला हांगिला की माला का माईत तॉ का बॉलातॅ तॉ. तॉ मद्राससॉ आन मॅ बॉम्बेसॉ.

मॅ तॅला पुडॅ समजाऑन हांग्यासॉ प्रयत्न कॅलॉ "अरे, ई बग. मॅ बॉम्बेसॉ आन माई भाशा हिंदी. तॅ तॉ मद्राससॉ आन तॅई भाशा तमिळ. तॉ जॉ केरळसॉ सुपरवायझर हाय ना तॅला मल्ल्याळम येतॅ आन तामिळ पन येतॅ. पन तॅआ मद्राश्याला मल्ल्याळम ये नाय भगून तॉ केरळसॉ सुपरवायझर तॅआ मद्राशाहरी तामिळमिनॅस बॉलातॅ. माला मल्ल्याळम तर येस नाय पन तामिळ पन माईत नाय, तॅतॅन ते दोगी का बॉलात्यात ता माला कईस कळला नाय." वीस - पंचवीस ईडल्यो तॅआ अरब्या तॉडात एकदम भरॉन कुनॅतरी ता दांडीॲ शिळक्या लाविलता आहास माला वाटला त्या तॉड बगॉन.

"अच्छा! मंग तॉ मद्राशी कॅम्पबॉस तूआ हरी हिंदित नातॅ इंग्लिश मिनॅस बॉलातॅ हायदॅ नाय गा?" मॅ अगोदर वर केलेली माई बिल्ली तॅनॅ मालास आडे म्याव केलती. मॅ उत्तर दिला, " नाय, अरबीमिनॅ." अरबीमिनॅ बॉलातॅ ई आयकिता बरबर तॅनॅ डॉखा खरखारॅ खाजविला. जहनी तॅआ डॉख्यात खाजूर उगव्या लागलोतॅ. "का.....? तुमे दोगी इंडियन्स ॲकमॅकांहरी अरबीत बॉलात्या...?" मॅ तॅला माकून समजावॉन हांग्यासॉ प्रयत्न कॅलॉ, " हा! अरे, ई बग! १९७० शा दशकात तामिळनाडु मिनॅ हिंदी भाश्योर साफसूफ बॅन हाडलोता, तॅतॅन तॅला हिंदी ये नाय आन तॅआ ईंग्लिश पावली कम शारानॅ हाय, तॅतॅन मॅ शक्यतो तॅआहरी अरबीस बॉलातॅ."

मॅ आहा बॉलातॅ ऑड्यात माव फ़ोन वाजातॅ.नंदाखालशा दॅवळाआ हनाआ विश क-या करता माला वसईशा ॲका मित्रानॅ फ़ोन कॅलतॉ. मा बॉलना खपल्योर तॅआ अरब्यानॅ तॅआ केरळशा सुपरवायझरला विसारला की मॅ का फोनवर बोयलॉ ता तॅला कळला गा? तॅ तॅआ सुपरवायझरनॅ "नाय" आहा करीत मुंडी हलविली. सुपरवायझरनॅ तॅला हांगिला की तॉ मल्ल्याळम बॉलातॅ आन मॅ फोनवर मराठीत बॉलातोतॉ. ता आयकॉन तॉ अरबी गॉंधळॉन माला विसारतॅ, " कय रॅ, थॉड्या वॅळा अगोदर तू माला हांगिलता की तूई भाषा हिंदी हाय भगून, मंग आतॅ ई कूहनी नवी भाशा तू बॉलातोतॉ." मॅ तॅला माकून समजाव्यासॉ प्रयत्न कॅलॉ, "ई बग ! आमशा बॉम्बेकराई जरी मूळ भाशा मराठी अहाली तरी आमे दोन मराठी जने शक्यतो ॲकमॅकांहरी हिंदीतूस बॉलात्याव ई एक सत्य हाय!

आन तुला खरा हांगॉ गा, मराठी पन आमशी मूळ भाशा नाय तॅ आमशी खरी बोलीभाषा 'कादोडी'स हाय." ई आयकीता बरबर तॅॲ डॉळॅ हनाला काडलॅल्या फुग्यागथीन जालॅ. मॅ तॅला पुडॅ हांगिला की, "थांब, अजून खपला नाय. आमशा कादोडीत पन ॲंगारशी कादोडी आन तॅंगारशी कादोडी बोयली जातॅ. ॲंगारशा कादोडीत फुग्याला फुगॅस बॉलात्यात आन तॅंगारशा कादोडीत फुग्याला...." मा बॉलना खप्या ग नाय तोस तॉ गाडी घॅऑन छू...! मॅ किचनमिनशा सावळाआ गुणीओर बगिला तॅ, तॅ खी खी आहातोतॅ..!

---

# नाताळसॉ हन - बर्नड लोपीस, आगाशी

लानपनी नाताळ ऑ शब्दस मायती नॉतॉ. नाखोडी समज आली तिगाळा वाट्यासा ऑ हन मंजॅ जक्ल्यो नाताल नावाशो बायको हात तॅआऑ हन हायदॅ. समज वाडली तिगाळा कळला आपल्या बयसा पन नाव नातालूस हाय. मंजॅ ऑ हन आपलॉस हाय. अजून समज वाडात गेली आणि कळला मॅ पन नाताळश्यास दिहा जन्मा आलॅ. जकलॅ संदर्भ हळूहळू बदलात गॅलॅ.

नाताळश्या हनाआ आठवड्यात करज्याव वास या घरातनॅ खिरयासॉ आन तॅआ घरातनॅ उतरॅसॉ. केकबिकसा कंत्राट इस्ट इंडिअन लॉकांदरीस हॉता. नातालशी हुट्टी बरी दायेक दि अहयाशी. आमे लाने पोरे गायीसॉ गॉठॉ करॅशा मांगॅ लाग्याशे. शाळीसेक वहराआदीसॉ काळ. गावात्सॉ बस्त्याव बाबाऑ बंगलॉ होडलॉ तॅ बी कुना पन घरात

'जेजुबाळ' मांडीता आलोस्ता अहिस परिस्थिती होती. जकल्यो मरिया मावल्यो आन बहुतेक जोसेफ हाकोटपासून हांजपोत भाटात खप्याशे. गरिबीला हातभार लागावॉ, भगुन नेमकी दिवाळी हॉवॉन गेली गा मंगुस हनात काकडयाला नेमकी भर याशी. दा पैशे पुडी आन ऑबडॉ माल. तॉ माल बांद्या खॉलॅ लाग्याशॅ. जडे हापडदॅ तडने खॉलॅ कापॉन हाड्याशॅ ई आम्सा काम. आमे जकली डॉक्टर मंडळी हाथात चाकू घॅऑन फिरतीस अहयाशी. एक इंच खॉलॉ दिखालॉ गा कॅला अपरिशान. तिगाळा आम्श्या अडे काक्ड्याअॅ भाग ऑबडॅ आन केळीअॅ तापॅ मॉजकॅ. आतॅ आपल्या अडे जॉहॉ पोग्याव तॉटॉ पडलॅ तहीस गत होती. मॅ तॅ एक बारका चाकुआ पात कायमसा खिशात ठव्यासॉ. आमश्या शाळी मॅरॅ एक वाडी होती. तडश्या गटारात केळीये बुडे खिनॉन टाकीलेले होते. तडॅ भॉटॅ भॉटॅ पॉगॅअॅ निग्याशॅ. मा लक्ष अभ्यासोर कमी आन खोल्योर जास्ती अह्यासा. शाळा हुटली गा मॅ तॅ खॉलॅ कापॉन, थॉटॅ-बीटॅ हुऑन मस्त गुंडाळी करॉन दफ्तरात घालॅसॉ तॅतॅन मा सव्विआ इतिहासाआ पुस्तकामिनॅ तॅआ खॉलॅअॅ डाग पडॉन माअॅ खॉलॅ इतिहासात पन नोंदलॅ गॅलतॅ. नाताळसॉ हन मीनजॅ घारा मटन यासॉ दी. वखत बरॉ तॅआ घारा सान्ने पॉळॅ हौशेनॅ काड्याशे. पन पयले सातआठ सान्ने मॅरॅ-दॅरॅ वाटील्याखेरीज घरात मॉड्याशी रीत नोती. पैसॉ नॉतॉ पन मया होती.

नाताळश्या हनाला नवीन कपडे हिव्याशी रीत होती. निदान पॉरा-पारा करतान तरी कपडे हिविले जाशे. थंडीमुळॅ एक फायदॉ हव्यासॉ, स्वेटर घायला गा तॅआ खालसा जुना सदरा दिख्यासा नाय. मॅ सातवीत असतानाशी गोष्ट. माला कपडे हिव्या दिलते. गुलाबी रंगाआ सदरा आणि चॉकलेटी कलरशी टूमान. लांबी टूमान मीनजॅ जवळपास लग्नाआ सुटाहारकी मान्याशी गोष्ट. तीगाळा आगाशीला खूप टेलर हॉतॅ. पन आम्सॉ फॅमिली टेलर मीनजॅ बुदु. आम्सॉ दुदाऑ उकडॉ पयलॉ तॅआ घारा हॉतॉ. पुडॅ आम्शी भय उडली. पन उदारी बाबतीत बुदुशेट भयश्या दुदाला जागलॉ. तॉ खरस दिलदार महानु हॉतॉ. माआ माप एक मयनॉ अगोदरूस दिलता. दोनू कापडे मॅ मन लावॉन बगीलते. माला घरनॅ हान्गीलता कि तुला कपडे हिव्या दिल्यात ते जाले गा शाळीतनॅ घिती ये. सदरा आणि टूमानिया कापडा मॅ निर्जॅतनॅ उठॉन पन ओळखिलोस्सा ऑडा मा मनात बॅहॅलता. बुदु टेलरश्या दुकानात कपड्या काशिया कबाडात माआ टूमानिया कापडा शाळीत जाताना माला नेहमी दिख्यासा. सदरया कपडा तॅनॅ कडे ठविलता देव जानॅ. दि जातोतॅ पन कपडा कय तडसा हलात नॉता. बुदुशेट कडे हिव्यादो बाहॅदॅ गनी अहि धास्ती वाट्याशी. नाताल्श्या हनायी रजा सुरु जाली तरी कापडा तडेस हॉता. कपडे हिवॉन येद्यात गा नाय अहि एक नवी धास्ती सुरु जाली. आतॅ बवतेक जेजुबाळा पयल्या वाडदिहालास नवे कपडे ॲनार ऑहॉस मॅ अंदाज कॅलॉ. नाताळसा रातसा बारा वाजता मिस्सा अह्यासा. दा वाजता गायीशा गॉठयामॅरॅ तापना हव्यासा.

हान्शॅ सात वाजलॅ ताप्न्यायी तयारी जाली पन कापडाऑ कय पत्तॉ नॉतॉ. जीव वावळीहारकॉ हुकलॉ. तॉड्यात घारा कुनॅ हान्गीला, 'अरे तू कपडे नाय हाडया गॅलॉ तॉ? तुये कपडे हिविल्यात'. माला शार पाय जालॅ. मॅ हापात हापात बुदुआ दुकानात पॉसलॉ. दुकानात जाम गर्दी होती. जे ते कपडे न्यादो आल्ते. मॅ कॉपऱ्यात उबी हॉतॉ. कुना ई बाकी, तॅ कुना ता बाकी. दुकानात जाम माज पडलोतॉ. काम रखडव्याश्या बाबतीत सगळॅ टेलर हारकॅस ई बाकी त्यादिहा माला कळला. चार पाच माहने त्यो जकल्यो रगाजळी निस्तारतोते. बुदुशेट वॅळयापारा नाकुट वर सडवॉन 'याचं हे कर त्याचं ते कर' आहा हान्गॉन कटिंग काउंटरवरनॅ सदरे टूमानी त्या कारागिरादरी टाकीतोतॉ. नवेक वाजॅपोत गर्दी उगाळली. एक दोगेस रेले. माला वाटला ये आपल्याघतीन उदारी वाळेस हनार. ते पन गेले. ऑड्यात बुदुशेटशी नंदार मावर गेली, 'तुझं काय आहे रे'
मा पोटात फाळ पडलॉ. ऑ अहा विसारतॅ मन्जॅ ऑ भाहालॅ. जकला आवसान एकत्र करॉन मॅ हान्गीला 'शर्ट आणि लांबी पॅन्ट...गुलाबी आणि चॉकलेटी कलरची'... तॉड्यात 'बरोबर बरोबर' बॉलॉन तॅनॅ काउंटरशा मागश्या ढिगात हाथ घालॉन एक चॉकलेटी पॅन्ट वर काडली आणि कुहुन्या तरी वायल्यास भाशेत बॉलॉन आतमीनॅ कारागीरादरी उडविली. सात आठ सदरे बगिले पण गुलाबी कलरसा सदरा कय हापडात नॉता. शाळीत नापास हॉव्याशी धास्ती अहलेले पोरे रीझल्टशी वाट बगीत्यात तही मॅ मा गुलाबी कलरसा शर्ट हापड्याशी वाट बगीतोतॉ. पाशेक मिनटात एक कारागीर मा गुलाबी सदरा घॅऑन बार आलॉ. बाप रे ! नॅमका मास सदरा 'काज बटान करयादो धाड्लास नॉता. काजाये होल करॉन तॅला बाजूनॅ ओवरलॉक करयासां काम तिगाळा फक्त विरारला हव्यासा. दा वाजात आलतॅ. तडे गावात तापना

कॅलॅ तॅआ मॅरॅ जकले जमलेले हायद्यात आन अडे माला थंडीत घाम आलॅ. ऑड्यात मा गव माला बगीत टेलरशा दुकानात आलॉ. बुदुशेटनॅ तॅला अडसन हान्गीली पण लगेस उपाय पण हान्गीलॉ. बुदुशेटनॅ लगेस काजा जाग्योर तांबड्या खडूये रेगो मारल्यो. दाडी करयाश्या ब्लेडनॅ शार पास ठिकाणी उब्ब्यो शिरी मारल्यो. आन तॅआ ॲका कारागिरानॅ पटापट बटने लाव्या घेटले. १५-२० मिनटात मा सदरा एकदासा तयार जाला. पॅन्ट अगोदरूस तयार होती. एकदाशे माये नाताळशे नवे कपडे हिवॉन तयार जालते. आख्खा जुना सदरा दर वहरा स्वेटरश्या खाला लपव्याशी हिम्मत अहलॅलॉ मॅ तॅआ शार पास बटना मान्ग्श्या कापलेल्या काजा डोळ्यांना थॉडॉस घाबरणार हॉतॉ?

## कातर - **रोहन फरगोज, लानी सरगोडी, गास**

मे मईन्याई आखिरी खपॉन जून मयनॉ सालू जालतॉ. हाकोडशॅ साडेसात वाजलोतॅ. ऑड्यापारापन धडाक निंबार पडलॉता. या वहरा कय वायलास हॉआतॉता. पावसाळॅय दी अहॉनपन प्यापुरता पन पानी नॉतॉ. ढोरे मरात पडलोते. लॉकां घरसा अहला-नहला जकला धान खपात सल्लोता. भाटात खपनाऱ्याय हाल बगवात नॉतॅ. रॉज हाकोटे हेतोर जाऑन कांडयोर बॅहॉन हांजपोत एकमेका दुख हांग्याशे. मन तॉडास मॉकळा करॉन परत उद्या आपल्या नसपात (नशिबात) का वाडॉन ठोईलॅ हायदॅ याव विसार करॅशे.

ऑहॉस एक दी हाकोडशापारा खाट्योर बॅहॉन विसार करता करता दुमानॅ तेरसला हाक मारली, "आला आयकाता ! नाखॉडॉ घोटबर शा कर, मॅ जरशी आपलॉ बैल नॅऑन भाटात बांदीतॅ आन तडनॅस ग्रामपंचायतीत जाऑन नुकसानभरपाई करता नाव दिलता तॅआ काआ जाला ता बगीतॅ." दुमा ऑडास बोयलॉ आन तेरससॉ तॉडाव पट्टॉ सालू जालॉ. 'काल तुमाला मॅ का हांगीलता घरात हाकर नाय. कालशा पुरता होती ती खपली. मायारा वख्ता-वख्ता जादो माला लाज हॉतॅ. तॅऑस तडे हाल सल्ल्यात, तॅ ते माला का देद्यात आन सॉता का ठविद्यात. तूमॅ आख्खॉ दी तॉ बैल घॅऑन भाटात जाऑन बॅहॅत्या त्यापकशीन तॉ बैल वीकॉन तरी टाका, तॉ ॲकटॉ ठॉऑन पन आपल्या कय कामाव नाय. नुस्ती अवदसा..."

"चूप बॅहॅ" ! दुमा जोरात आडडालॉ. तू माला रॉज हांगीता पन कतॅ तरी तॅआ मुक्या जनवराऑ विसार कॅलतॉआ..? आला कालशा दिहापोत तॅनॅ आपल्याला उतपान दिला तॅओर आपला घर सल्ला, पोरे वाडले. आज तॅआ जोडीऑ बैल जरी मॅलॅ तरी ऑ या डॉकऱ्यापनात पन ॲकटॉ गाडा तानतॅ. तुला खाटकाई बुद्दी सुसातॅ तरी कही.' मॅ साल्लॉ भाटात., माऑ जीव गॅलॉ तरी मॅ ऑ बैल वीकॅसॉ नाय."

'आरे जाय जाय तुला आमशा जिवाई फिकीर नाय, तू तॅआ बैलाआ पाठी साप वॅडॉ जाल्या.' तेरस बोयली.

दुमा दापुडनॅ उतारलॉ, बैल घॅऑन सलतॉ जालॉ.

बैल हिवारात सरातॉतॉ. दुमा आन गावशी कईक मंडळी भाटात बेहेलते. दुमा रॉज बॉलॅसॉ पन आज वारता करॅदो तॅआ मन नॉता. तॉ तॅआ लाडक्या बैलाआवर डॉकायतोतॉ आन विसार करतॉतॉ. 'खरस माला घरशाइ कईस फिकीर नाया.' ? आज जरा तॉ गॉदाळलॉतॉ. कातरीत हापाडलॉतॉ. ॲका मॅरॅ कुटूमाऑ प्रश्न तॅ दुहरॅआ मॅरॅ पॉरा हांगडॉ लाडकॉ बैल हॉतॉ. दॅवानॅ तॅआ हरी खुब बॉड्डॉ खेळ खेळलॉतॉ. ऑ खेळ तॅला कडे घॅऑन जायदॅ ई दुमालास माइत नॉता.

दुहरॅआ दिहा दुमा पाते राती उठलॉ आन गॉठॅत बैलाआ पुडॅ ऊबी रॅलॉ. बैलानॅ रॉजशा हारकी मान हालवॉन दुमाआ स्वागत कॅला. ता बगॉन दुमाआ डॉळॅत पानी आलॉ. तॉ तॅआ बैलाआ पुडॅ ऊबी रॅऑन लान्या पॉरा गथीन

बॉलॅ लागलॉ, “ आरे पॉरा आजपोत मॅ तुई जतान केली आन तू माला साथ दिली. पन मॅ हरलॉ... मॅ हरलॉ. ई बॉलॉन दुमा रड्या लागलॉ. आज तुला वीकॉन जॅऑ पैशॅ येदयात तॅआत मॅ ॲखाद - दोन मयनॅ काडनॅ, पन तू नहल्या दुख माला वहरोन वहरी छळदॅ.

दुमानॅ हाकाबोटे बैल सापसुप धोवीलॉ. हिंगुटाला जरशी गीरू लाऑन रंगविलॉ. तॅआ गळ्याशी माळ आन पाग हारकी केली. दॅव्ळात जाताना जहा आपुन लान्या पॉरा हारका हुरका करत्याव, ताहास दुमा एक हारका बैलाआ करतोतॉ. दुमाई हाकोडपासून साललेली धावपळ तेरसनॅ बगीलती पन तीनॅ तॉडातनॅ एक शब्दपन नाय काडलॉ. दुमा तॉहॅास बैलाला घॅऑन सलतॉ जालॉ. तॉ बैलसुदा आपल्या मालका मांगी निष्ठावंत कामगाराहारकॉ सल्या लागलॉ.

हांशॅऑ सात वाजात आलतॅ. रॉज ऑडॅपारा निंबार अहॅसा पन आज थॉडॉ काळोख पडलॉतॉ. आबोर ढग जमॅआ लागलोतॅ. लोक दॅवाय आभार मान्या लाग्लोते. निदान आज नातॅ उद्या तरी पानी पडदॅ आहा वाट्या लाग्लोता. दुमा अजून घारा आलॉ नॉतॉ. तेरसनॅ पॉरांना आदीस हांगॉन ठोईलता ‘आजा तुमाला बरा-बरा खादो मिळदॅ. ऑडॅत लांबनॅ दुमा ॲताना दिखलॉ. ॲका हाथात बैलाआ गळॅशी घुंगराई माळ घॅऑन तॉ सलातॉतॉ. तॉ घारा आलॉ. शांतपनॅ हाथातशी माळ दापुड्शा खुटीला टांगविली.

ॲखादॅआ जकला कय लुटील्योर तॅआ दरी जगॅदो भूतकाळातश्यो जुन्यो गॉड आठोनी आहात्यात तॅआ जिवोर तॉ जगातॅ, दुमाआ पन तहास जाल्ता. तॅनॅ कब्ज्यामीनॅ हाथ घायलॉ आन आख्ख्ये पैश्ये मुठीत आवळलॅ आन तेरशीआ हाथात दिलॅ. मंग तॉ ओट्योर बॅहॅलॉ, गॉठॅतशा दावणीत तॅला तॅऑ लाडकॉ बैल पुसाटसॉ दिखातॉतॉ. वारॅई एक झुळूक आली आन खुटीला टांगलॅल्या माळीतश्ये घुंगरू हळुस वाजलॅ. तॅआव टिंग... टिंग आवाज आख्ख्या घरबर फिरलॉ. पसारलॉ.

## ***अंकाकरता देणगी***

## ***सिमसन रॉड्रिग्ज - १५७५०₹***

***आपल्या “आय बेट“ फेसबुक ग्रुपवरसा “कादोडी” अंका आर्थिक मदती करता केलेला आवाहन वासॉन तडाक १५७५०/- रूपयाशी मदत सौदी अरेबियातनॅ धाडनाऱ्या सिमसन रॉड्रिग्ज, पहराव याला “कादोडी” टिमश्या दरनॅ खुब खुब धन्यवाद.***

**<u>संपर्क / अभिप्राय</u> :-** आमश्या हरी संपर्क कऱ्याकरतान किंवा आपला या अंकाविषयी मत, तुमाला का आवडला, का नाय ता आमाला जरूर कळवा. आमश्या ई-मेल आयडी वर ई-मेल करा नाय तॅ फोन करा

**<u>सूचना</u>:-** कादोडी या अंकाव पुढसॉ अंक संज्यावश्या हनावेळेला, २१ जूनला प्रकाशित होणार. या अंकात तुम्हाला लेख कविता आहा कय साहित्य द्यासा हायदे ते १ जूनपर्यन्त **kadodivasai@gmail.com** मेल करा किंवा संपादक मंडळाला संपर्क करा.

**नाताळसॉ हन सगळ्या वाचकांना खुब आनंदाव आन मजेऑ जाव अहयो शुभेच्छा**

या अंकात प्रसिद्ध झालेल्या मताशी संपादक मंडळ सहमत हायदेस आहा नाय.

# तुमॅ जर खरॅ कुपारी हायद्या तर - शालेट रोझारिओ, वाघोली

तुमॅ जर खरॅ कुपारी हायद्या तर,

- कुनालाही फोन केल्योर तुमसॉ पयलॉ प्रश्न- "कडे हा?" आन त्यानंतर लगेसूस "जिव्या का केलता?"
- तुमसॉ कुहुनॉस हन तळनायो रोट्यो, फुगॅ, आन मटना रसाशिवाय पूरॉ हॉयॅ नाय.
- तुमशा कुटुंबातसॉ नीदान एकतरी माहनू कुक, इंजिनिअर नातॅ शीपवर हाय.
- आपल्या भाषॅऑ तुमाला ऑडॉ अभिमान की बजारातशा भैयाहरी पन तुमॅ कादोडीतूस बोलनार आन हळूहळू त्यालापन अस्खलित कादोडी हिकावनार.
- जिगाळा जिव्या फक्त दाळ आन धान हाते तीगाळा जराही विसार न करता तुमॅ फ्रीजमीनॅ बारा मयनॅ तॅरा काळ अहलेला कालवान आन बुम्बलाई काडी काढत्या.
- केक तॅ आपल्याला कय जमॅ नाय त्यामुळॅ नाताळशा हनाला आपला करज्यो आन रॅवाळास बरा.
- सगळ्यात प्रसिद्ध आन जास्तीत जास्त वेळा वापरला जानारा वाक्य - "तूआ आयसॉ नवरॉ"
- मोरली, पांढऱ्या कांद्याई माळ, आन मुंड्यातसॉ आंबॉ याशिवाय कुपाऱ्या सुलीपूढ पुरा हॉयॅ नाय.
- तुमशे नावे बो इंग्लिश हायद्यात-फ्रान्सीस, लुइस पन हाक माऱ्यादो फरशा, लुशा अहेस नावे बरे वाटात्यात.
- या इंग्लिश नावापायान लोकांना तुमॅ इंग्लिश वाटात अहले तरी तुमशापैकी जवळ जवळ सगळेस मराठी शाळीत हिकल्यात.
- रोज जीवील्योर तुमॅ एक कॅळा इ खालास पाय.
- तुमशाकरता आयतवारसा मिस्सा सक्तीआ हाय आन देऊळशॅ सगळॅ गानॅ जरी तुमॅ मन लावॉन बोलात्या हायद्या तरी त्यायॅ शब्द आपल्याला क्वचीतूस हुमजात्यात . (मला का तेजीले / माला कते दिले )

# कुपारी लवस्टोरी - एमेल आल्मेडा, सॉकाळा

तॉ हिवारात भय साऱ्यादो जासॉ,<br>
ती तडे वालाय हिंगो खुडयादो याशी.<br>
त्याई भय तीआ वालात खिरली,<br>
ती बार काड्यादो तीनॅ त्याला बोंब मारली.<br>
मुका जनावर दोन टापू खाले तॅ ऑडा कादो शिडयासा,<br>
नुकसान करॉन वरती उलट बॉल्यासा.<br>
दॉगामीनॅ थॉडॉसॉ वाद जालॉ,तडेस त्या मनात एक विसार आलॉ.<br>
चुकला मा,माफ कर, तॉ माघार घॅवॉन मॉकळॉ जालॉ.<br>
तीला वाटला मॅ जिकली,तीआ तोंडोर हावा आला,<br>
तॉ मनात हावलॉ, आतॅ मा मनाहारका जाला.<br>
त्याई भय पाण्योर तळ्याखाला जाशी,<br>
तीपन तडे कथान धव्या याशी.<br>
तॉ भयला बॉल्यासॉ, ती गालात हाव्याशी,<br>
तॉ पन खुष हव्यासॉ स्वतः स्वतःशी.<br>
अह्याप्रकारे कुपारी लवस्टोरी बहरत गेली,<br>
पण प्रोड्युसर नॉतॉ भगून ई फिल्म अर्धवटूस रेली.

**जकल्या ख्रिश्चन बाहा-बेंनींना नाताळश्या हनायो आन नव्या वहारायो हार्दिक शुभेच्छा !!**

जागवा रे, पेटवा रे, चेतवा स्वाभिमान हा...



**जकले पदाधिकारी अन कार्यकर्ते**

# स्वाभिमानी वसईकर संघटना